# कुळगांव-बदलापूर नगरपरिषद, कुळगांव.

जावक क्रमांक/कु-ब.न.प./बां.प./२०११-१२/१८५८-९३८

कुळगांव-बदलापूर नगरपरिषद कार्यालय,कुळगांव.

युनिक क्र. ९३८ दिनांक : २५ / ८ /२०११

नीला राजाराम नाडकर्णी व इतर एक यांचे कु.मु.प.धारक मे.वास्तु बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्सचे, भागीदार श्री.नितीन म्हात्रे.

श्री. शशांक अहिरे, वास्तुशिल्पकार, अंबरनाथ.

स.नं.१ हि.नं. १७ व प्लॉट नं.२, मौजे जोवेली, ता.अंबरनाथ येथे बांधकाम करण्याच्या मंजूरी बाबत.

आपला दि. १२/७/२०११ चा अर्ज क्र.१०५६०

शशांक अहिरे, वास्तुशिल्पकार, अंबरनाथ, यांचे मार्फत सादर केलेले अर्ज.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये.

हि.नं. १७ व प्लॉट नं.२, मौजे जोवेली, ता.अंबरनाथ मध्ये ४२१.१८ चौ.मी. पैकी ४२७.५१ चौ.मी.नियोजित क्षेत्र च्या विकास करावयास महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या ७/२०११ च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत -------- रंगाने दुरुस्ती केल्याप्रमाणे तळ मजला/पहिला मजला/दुसरा मजला/तिसरा मजला/चौथा मजला (पैकी) /रहाणेसाठी/ इमारतीच्या बांधकामाबाबत, बांधकाम परवाना/प्रारंभ प्रमाण पत्र देण्यात येत आहे.

-: अटी : -

ही बांधकाम परवानगी दिलेल्या तारखेपासून एक वर्ष पर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नुतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहील. अशाप्रकारचे नुतनीकरण फक्त तीन वर्ष करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. नुतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेतांना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमाचा व नियोजित विकास आराखडयाच्या अनुशंगाने छाननी करण्यात येईल.

नकाशात----------------- रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

मा.जिल्हाधिकारी ठाणे, यांजकडून बांधकाम चालू करावयाचे अगोदर बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी तुमच्यावर राहील व बिनशेतीच्या परवानगीची एक सत्य प्रत काम सुरु करावयाचे पंधरा (१५) दिवस अगोदर नगरपरिषदेकडे पाठविणे आवश्यक राहिल.

बांधकाम चालू करण्यापूर्वी (७) दिवस आधी नगरपरिषद कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमिनी व्यतिरिक्त जमिनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटी प्रमाणे करता येईल. जोत्यापर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केल्या बाबतचे प्रमाणपत्र नगरपरिषदेस सादर करण्यात यावे त्यानंतरच जोत्यावरील बांधकाम करावे.

भूखंडाचे हद्दीत भोवती मोकळ्या सोडावयाच्या जागेत बदल करु नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये. तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्द झाली असे समजण्यात येईल.

इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची हमी (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपल्या वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहील.

बांधकाम पुर्णतेचा दाखला / वापर परवानगी घेतल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये त्यासाठी जागेवर ज्याप्रमाणे बांधकाम पुर्ण झाले आहे त्याचा नकाशा वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांच्या विहीत नमुन्यातील अर्जासह (५ प्रतीत) इतर आवश्यक कागद पत्रासह सादर करण्यात यावा.

बांधकाम चालू करण्यापूर्वी नगर भूमापन अधिकारी / भूमी अभिलेख खात्याकडून जागेची आखणी करुन घ्यावी आणि तसा दाखला नगरपरिषदेकडे सादर केल्यानंतर बांधकाम सुरु करावे.

नकाशात दाखविलेल्या गाळ्यांच्या संख्येमध्ये व नियोजनामध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल करु नये.

नवीन इमारतीस मंजूर नकाशे प्रमाणे सेप्टीक टँक पाहिजे व संडास भविष्य काळात जवळच्या मलनि:सारण नलिकेस

उहन-२
६७० / २०१६
२५ / ३२